# ॥ विश्वपंढरी ॥

स्वच्छता...सुगंध...साधना



॥ श्री माधवनाथ महाराज ॥

देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहाळे
मंगलानी गंधलेले सुंदराचे सोहळे..
देखणी ती पाऊले जी ध्यासपंथी चालती
वाळवंटातून सुध्दा स्वस्तिपद्मे रेखिती...



सद्गुरु श्री आनंदनाथ सांगवडेकर
अध्यक्ष
**श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज**
**रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर**



प. पू. दादा महाराज तथा माधवनाथ महाराज सांगवडेकर यांच्या आशीर्वादाने साकारलेली वास्तू... विश्वपंढरी! मूलत:च सर्वांगीण वैभवाने युक्त असलेल्या कोल्हापूरच्या वैभवात भर घालणारा प्रकल्प... विश्वपंढरी!

प.पू. दादामहाराज यांनी स्थापन केलेल्या श्री सद्‌गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्टतर्फे विश्वपंढरीची व्यवस्था पाहिली जाते. समाज विकास व प्रबोधनासाठी आवश्यक अशा आध्यात्मिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैद्यकीय व शैक्षणिक आदी उपक्रमांचे ट्रस्टतर्फे महाराष्ट्रभर वर्षभर आयोजन केले जाते.

- **वैद्यकीय उपक्रम :** ट्रस्टतर्फे संचालित केल्या जाणाऱ्या श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व पंचकर्म केंद्राद्वारे महाराष्ट्रातील विविध ठिकाणी सेवाभावी वैद्यकीय शिबिरे आयोजीत केली जातात. शिबिरांमध्ये आयुर्वेदिक औषधे अत्यंत माफक दरामध्ये उपलब्ध करून दिली जातात.

- **आध्यात्मिक उपक्रम :** ट्रस्टचा प्रमुख उद्देश अध्यात्माचा प्रसार व प्रचार करणे हा आहे. कारण अध्यात्मामुळे समाज विचारी व संस्कारीत बनतो. त्यामुळे ट्रस्टतर्फे वर्षभर विविध आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. यामध्ये प.पू. सद्‌गुरू श्री विश्वनाथ महाराज रुकडीकर व प.पू. दादामहाराज सांगवडेकर यांचा पुण्यतिथी उत्सव, आषाढीवारी, महाशिवरात्र, दत्तजयंती यांचा समावेश होतो.

- **सामाजिक उपक्रम :** आपण ज्या समाजामध्ये राहतो त्या समाजाचे आपल्यावर काही ऋण असतात हे लक्षात ठेवून ट्रस्टतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. समाजातील वंचितांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना मदत दिली जाते. तसेच माऊलीवत् कार्यरत असणाऱ्या सेवाव्रतींकरिता ट्रस्टतर्फे "माऊली आनंदी" पुरस्कार दिला जातो. नैसर्गिक आपत्तीच्या वेळीही ट्रस्टच्या महाराष्ट्रभर पसरलेल्या केंद्रांतर्फे मदत दिली जाते.

- **शैक्षणिक उपक्रम :** व्यक्तीच्या आयुष्यातील शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. म्हणून ट्रस्ट तर्फे समाजातील गरीब व गरजू अशा होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत दिली जाते.तसेच १ली ते १०वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता श्री विश्वप्रणाली संस्कार शिबीर आयोजित केले जाते.

प.पू. दादामहाराजांनी रोवलेल्या या रोपट्याचे संवर्धन प.पू. सद्‌गुरू श्री आनंदनाथ महाराज हे तितक्याच आपुलकीने करत आहेत.



चारा वाटप



सामाजिक संस्थेस आर्थिक मदत



गारपीटग्रस्तांना मदत



गरजू रूग्णांना आर्थिक मदत




सेवाभावी उपचार शिबीर



वारी मार्गावर मोफत दवाखाना



विश्वप्रणाली संस्कार शिबीर



अन्नदान



वारी -विश्वपंढरी ते श्री क्षेत्र पंढरी

## माऊलीवत् कार्यरत असणाऱ्या सेवाव्रतींकरिता ट्रस्टतर्फे देण्यात येणारा पुरस्कार




|| माऊली आनंदी पुरस्कार ||



|| पां.ना.कुलकर्णी पुरस्कार ||

## संत साहित्यातील अभ्यासकांना दरवर्षी देण्यात येणारा पुरस्कार



|| श्री सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज ||




|| श्री सद्गुरु देवनाथ महाराज ||



|| श्री सद्गुरु चूडामणीनाथ महाराज ||




|| श्री सद्गुरु गुंडा महाराज ||




|| श्री सद्गुरु रामचंद्र महाराज (बुटी) ||



|| श्री सद्गुरु महादेवनाथ महाराज ||




|| श्री सद्गुरु रामचंद्र महाराज (तिकोटेकर) ||



|| श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज ||



|| श्री सद्गुरु गोविंदनाथ महाराज ||



|| श्री सद्गुरु माधवनाथ महाराज ||



|| श्री सद्गुरु आनंदनाथ महाराज ||

# || सदगुरु परंपरा ||

विश्वामध्ये भारतीय संस्कृती ही अनेक दृष्टीने श्रेष्ठ समजली जाते. या संस्कृतीने विश्वाला प्रदान केलेली अनमोल देणगी म्हणजे सदगुरु परंपरा.

**ना आदिगुरु शंकरा। लागोनि शिष्यपरंपरा ।**

**बोधाचा हा संसरा। जाला तो आमुते ।।**

आदिनाथ शंकरांपासून सुरु झालेली नाथ परंपरा श्री ज्ञानेश्वर माऊलींपर्यंत आली. आदिनाथ-मच्छिंद्रनाथ गोरक्षनाथ-गहिनीनाथ-निवृत्तीनाथ-ज्ञानदेव ही नाथपरंपरा सुप्रसिद्ध आहे. ज्ञानदेवांच्यानंतर अनेक ठिकाणी या परंपरेच्या शाखा वाढल्या. हीच परंपरा देवनाथांपासून सुरु होऊन दादामहाराजांपर्यंत आली. सोऽहं साधना हा या परंपरेचा प्रमुख धागा आहे. दक्षिणकाशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या करवीर नगरीमध्ये नाथसंप्रदाय व वारकरी संप्रदाय यांचा सुरेख संगम असलेले ठिकाण आहे.... **विश्वपंढरी!**

प.पू. दादामहाराजांनी रोवलेल्या या रोपट्याचे संवर्धन प.पू दादामहाराजांचे चिरंजीव प.पू. सद्गुरू श्री आनंदनाथ महाराज हे तितक्याच आपुलकीने करत आहेत.

इवलेसे रोप लावियले दारी । तयाचा वेलु गेला गगनावरी... या माऊलींच्या ओवीचा अनुभव आज विश्वपंढरीत येणारे भाविक घेत आहेत.




प.पू.दादामहाराजांची हस्तलिखित ज्ञानेश्वरी




अक्षर माधव




श्री भावार्थ देवनाथायन




श्री वानरगीता



स्तवन स्तोत्र



श्री विश्वनाथायन

## अत्तरे

## बॅच

## लॉकेट



## अगरबत्ती



## सी.डी.

- विठ्ठल स्तवन
- सद्गुरु अष्टके
- आरती संग्रह
- प.पू.दादांची आशीर्वचने
- श्री.रामराया सांगवडेकर यांची ज्ञानेश्वरी वरील प्रवचने

























# ‘विश्वपंढरी’


## समाजप्रबोधनासाठी ट्रस्टतर्फे प्रकाशित केले जाणारे मासिक

















### सभासद वर्गणी

- रु. १५०/- (वार्षिक)
- रु. ५००/- (४ वर्षे)
- रु. १०००/- (८ वर्षे)

॥ ॐ । श्री । 卐 ॥

श्री विश्ववती

चला भारत सशक्त करूया !




# श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर, कोल्हापूर

# श्री विश्ववती

## आयुर्वेदिक चिकित्सालय आणि पंचकर्म केंद्र

आयुर्वेद ही अत्यंत प्राचीन वैद्यकीय चिकित्सा पध्दती आहे. प.पू. दादा महाराजांनी आयुर्वेदाचे महत्त्व लक्षात घेऊन त्याचा प्रचार व प्रसार करण्याचे ठरविले व त्यासाठी श्री विश्ववती चिकित्सालय व पंचकर्म केंद्राची स्थापना केली. चिकित्सालयातर्फे कोल्हापूरसह महाराष्ट्रातील विविध ठिकाणी आयुर्वेदिक उपचार शिबीरे घेण्यात येतात.यामध्ये विश्ववती येथे महिन्याच्या १ ल्या रविवारी वैद्य समीर जमदग्नी, २ ऱ्या रविवारी वैद्य अनिल बनसोडे, १ ल्या सोमवारी वैद्य विजय इगडे, ३ ऱ्या रविवारी वैद्या गौरी बोरकर , ४ थ्या रविवारी वैद्य सागर कवारे यांच्या शिबीरांचा समावेश आहे. तसेच दर पौर्णिमेस श्री क्षेत्र नृसिंहवाडी( कोल्हापूर), पारडसिंगा (नागपूर), ३ ऱ्या बुधवारी श्री क्षेत्र सांगवडे( कोल्हापूर), संकष्टी चतुर्थीस सिध्दविनायक मंदिर, मुंबई, एकादशीस श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर ( नाशिक), श्री क्षेत्र आळंदी (पुणे)व श्री क्षेत्र पैठण (औरंगाबाद) व ३ ऱ्या गुरुवारी श्री क्षेत्र शिर्डी (अ.नगर) येथेही सेवाभावी शिबीरे आयोजित केली जातात. शिबीरांमध्ये गरीब व गरजु रुग्णांवर अत्यंत माफक शुल्कात उपचार केले जातात. ट्रस्ट तर्फे चालवल्या जाणाऱ्या आयुर्वेदिक उपचार शिबीरांचा लाभ दर महिन्याला साधारणपणे १००० रुग्ण घेत आहेत व व्याधीमुक्त निरोगी आयुष्य जगत आहेत. चिकित्सालयाचे प्रमुख वैद्यराज श्री. समीर जमदग्नी व त्यांचे सहकारी वैद्य प.पू. दादा महाराजांच्या आशीर्वादाने रुग्णसेवेचे कार्य अत्यंत निष्ठापूर्वक व सेवाभावीवृत्तीने करीत आहेत. भारताच्या माजी राष्ट्रपती मा. प्रतिभाताई पाटील व करवीर पीठाचे शंकराचार्य श्री विद्यानृसिंहभारती यांनीही त्यांच्या सेवेची संधी देवुन चिकित्सालयाचा लौकिक द्विगुणीत केला आहे.

॥ ॐ । श्री । फ्र ॥

श्री विश्ववती

चला भारत सशक्त करूया !

# श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर

'विश्ववती', विश्वपंढरीसमोर, श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर मार्ग,
मंगळवार पेठ, कोल्हापूर- ४१६०१२

## उपलब्ध सुविधा

- शास्त्रोक्त नाडीपरिक्षणाव्दारे रुग्ण तपासणी व उपचार
- सुसज्ज इमारत व प्रशिक्षित स्टाफ
- शास्त्रोक्त व अद्ययावत पंचकर्म विभाग
- दर रविवारी विशेष तपासणी शिबीर
- योग समुपदेशन व अभ्यास वर्ग
- मानसविकारावर आयुर्वेदिक उपचार
- हेअर स्पा व हेअर ट्रिटमेंट
- नैमित्तिक आजारांबरोबरच हृदयरोग, मधुमेह व कर्करोग यासारख्या दुर्धर आजारांवर विशेष उपचार.

संपर्क – ०२३१-२६२४०४४ ७३५०६२३६३६

www.shreevishwavati.com www.facebook.com/vishwavati









# श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

‘विश्वपंढरी’ ६९७/ब,श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर मार्ग, मंगळवार पेठ,
कोल्हापूर,महाराष्ट्र. पिन कोड– ४१६०१२.
संपर्क–०२३१–२६२००४४/७३५०६८३६३६

email - vmrtoffice@gmail.com
+91 7350683636
www.vishwapandhari.com
www.facebook/vishwapandhari
google play/vishwapandhari
www.youtube/vishwapandhari

vishwapandhari
whatsApp